**L. A. BILL No. XXVI OF 2024.**

A BILL
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA GOVERNMENT SERVANTS REGULATION OF TRANSFERS AND PREVENTION OF DELAY IN DISCHARGE OF OFFICIAL DUTIES ACT, 2005.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६.**

**महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**( विधानसभेने दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे. )**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा प्रख्यापित केला होता ;

२००६ चा महा. २१.

२०२४ चा महा. अध्या. ६.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंच्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ याच्या कलम ४ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ (यात यापुढे ज्याचा निर्देश, " मुख्य अधिनियम " असा केला आहे) याच्या कलम ४ मध्ये, पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

२००६ चा महा. २१.

"(४क) कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी सार्वत्रिक लोकसभा निवडणूक, २०२४ यासाठीच्या आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे, ज्या प्रकरणांमध्ये बदली करण्यात आलेली नाही, अशा प्रकरणांमध्ये, ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत बदली करण्यात येईल.".

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

**३.** (१) महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

२०२४ चा महा. अध्या. ६.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ (२००६ चा महा. २१) (यात यापुढे ज्याचा निर्देश, “ उक्त अधिनियम ” असा करण्यात आला आहे), हा शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन करण्यासाठी आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध करण्यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियमित करण्यात आला आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ३ मध्ये पदस्थापनेचा पदावधी ज्यात, अखिल भारतीय सेवेतील अधिकारी आणि अ, ब आणि क गटातील राज्य शासनाचे सर्व सेवक किंवा कर्मचारी यांच्याकरिता एखाद्या पदावर असण्याचा सामान्य कालावधी तीन वर्षांचा असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये बदलीच्या पदावधीची तरतूद केली असून त्यातील पोट-कलम (४) मध्ये, शासकीय कर्मचा-यांच्या बदल्या, सामान्यपणे, वर्षातून एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्यात येतील अशी तरतूद करण्यात आली आहे.

२. भारतीय निवडणूक आयोगाने, सार्वत्रिक लोकसभा निवडणूक, २०२४ यासाठी १६ मार्च २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू केली होती आणि ती ४ जून २०२४ पर्यंत अंमलात होती.

३. उक्त आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे शासकीय कर्मचा-यांच्या बदल्या करण्यात आल्या नव्हत्या. त्यामुळे, उक्त अधिनियमाच्या कलम ४ मध्ये सुयोग्य सुधारणा करून, सर्वसाधारण बदलीसाठीचा उक्त कालावधी ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत वाढवणे इष्ट वाटले.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) अध्यादेश, २०२४ (२०२४ चा महा. अध्या. ६), हा प्रख्यापित केला होता.

५. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर, **देवेंद्र फडणवीस,**

दिनांक १५ डिसेंबर, २०२४. मुख्यमंत्री.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६.]**

**[महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[विधानसभेने दिनांक १७ डिसेंबर, २०२४ रोजी संमत केल्याप्रमाणे.]**

**[श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर